नि.फौ.ख.क्र.१०३/२०१८.
सरकार वि. भोजराज व इतर
निशाणी क्र.१८०.

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** - हिरामन दामाजी चिंचोळकर
**वय** - ५५ वर्षे **व्यवसाय** - गाईड,
**राहणार** - पिंपरीया, तह.रामटेक, जिल्हा नागपूर.

**<u>सरतपास सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.एम. राऊत यांच्या तर्फे</u>**

**०१.** मी मागे हजर आरोपींना ओळखतो कारण ते माझ्या गावाजवळ राहतात. दिनांक ०७.०५.२०१८ रोजी वनअधिकारी यांनी आम्हाला पेंच तोतलाडोह डॅमच्या बाजूला बोलविले होते. तेथे आरोपी नव्हते. त्याठिकाणी सुर्यभान इडपाची व माझी सही घेतली होती. आता साक्षीदाराला निवेदन पंचनामा निशानी क्रं. १११ दाखविला त्यावर अनु क्रं. २ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**०२.** असे काही घडले नाही की, दि. ०७.०५.२०१८ रोजी सकाळी ६.४५ वाजता वनअधिकारी यांनी पिंपरीया तोतलाडोह येथील कसटडीत बोलविले व त्यांच्या ताब्यातील आरोपी बलराम ताकोद, नंदु मोरेशिया व चंदन मोरेशिया यांनी जंगलात कशापद्धतीने प्रवेश केला व त्याठिकाणी स्वयंपाक करून कुठे-कुठे मुक्काम केला त्याबाबत आरोपींनी आम्हाला सर्व जागांची माहिती दिली व दाखविली व त्याबाबतचा निवेदन पंचनामा आमच्या समक्ष तयार करून माझी, दुसरा पंच सुर्यभान, तिन्ही आरोपी आणि वनविभाग अधिकारी यांनी सह्या केल्या.

**<u>साक्षीदार हा त्याच्या पंचनाम्यातील मजकूराशी विसंगत साक्ष देत असल्याकारणाने सरकारी वकीलांनी उलटतपासणीच्या स्वरुपात उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.</u>**

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, दि. ०७.०५.२०१८ रोजी सकाळी ६.४५ वाजता वनअधिकारी यांनी पिंपरीया तोतलाडोह येथील कसटडीत बोलविले व त्यांच्या ताब्यातील

आरोपी बलराम ताकोद, नंदु मोरेशिया व चंदन मोरेशिया यांनी जंगलात कशापद्धतीने प्रवेश केला व त्याठिकाणी स्वयंपाक करून कुठे-कुठे मुक्काम केला त्याबाबत आरोपींनी आम्हाला सर्व जागांची माहिती दिली व दाखविली व त्याबाबतचा निवेदन पंचनामा आमच्या समक्ष तयार करून माझी, दुसरा पंच सुर्यभान, तिन्ही आरोपी आणि वनविभाग अधिकारी यांनी सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांना वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपासणी आरोपी क्र.१,४, ५, ७ ते ९,११,१३ ते १५,१७ ते १९ व २१ ते २३ करीता श्री ए.व्ही.गजभिये यांचेतर्फे श्री. ए.एम. काशीकर यांनी उलटतपास नाकारला. सबब उलटतपास नाही.**

**उलटतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीं क्र.३,६,१०,१२,१६,२०,२४ करीता ॲड.श्री.ए.जी.कारेमोरे यांनी उलटतपास नाकारला. सबब उलटतपास नाही.**

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास काही नाही**

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-
**(श्रीमती. डी. एस.सैंदाणे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट.न.२, रामटेक

रामटेक
दिनांक - १३/०१/२०२५